भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्ली (ICSSR) प्रायोजित


# विदर्भ अर्थशास्त्र परिषद

## ४३ वे वार्षिक अधिवेशन २०१९

## दि. २ व ३ फेब्रुवारी २०१९

# अर्थवेध

## (स्मरणिका)





बॅकवर्ड क्लास युथ रिलीफ कमिटी, खामला रोड, नागपूर द्वारा संचालित

## भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

Accredited with Grade B (CGPA-2.54) by NAAC, Bengaluru

मुख्य संपादक

डॉ. सुनिल शिंदे

Scanned by TapScanner

# अणुक्रमणिका

## प्रथम सत्र : भांडवलशाहीच्या जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा


१. भारतातील जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा — प्रा. डॉ. जे.व्ही. गायकवाड ........ १५
२. जागतिकीकरण आणि भारत — डॉ. अर्चना बी. जैन ........ १८
३. भांडवलशाहीच्या जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा — प्रा. डॉ. नागोराव के. सोरे, कु. पायल विनोद भोयर ........ २२
४. भांडवलशाहीच्या जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा : भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात — डॉ. सिद्धार्थ सुखदेव मेश्राम ........ २६
५. भांडवलशाहीच्या जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा : जागतिकीकरणानंतर कृषीक्षेत्रातील यशापयश — प्रा. दिलीप पांडुरंग महाजन, डॉ. राजेंद्र रामराव गव्हाळे ........ ३२
६. भांडवलशाहीच्या जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा — डॉ. (सौ.) मंजुषा राजेंद्र ठाकरे ........ ३६
७. भांडवलशाहीच्या जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा — सुनिल प्रभाकर घुगल ........ ४०
८. जागतिकीकरण - भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील एक आव्हान — डॉ. दिपक को. शृंगारे, प्रा. निलेश म. मोहकार ........ ४५
९. जागतिकीकरणाच्या भारतीय अर्थव्यवस्थेतील उपलब्धी व मर्यादा — डॉ. विजय बनकर, डॉ. श्रीकृष्ण बोढे ........ ४९
१०. जागतिकीकरण आणि भांडवलशाही — डॉ. शमापरवीन सरफराज खान ........ ५२
११. जागतिकीकरणाचे बदलते स्वरूप व आवश्यकता — डॉ. संजय धनवटे ........ ५३
१२. जागतिकीकरण व भांडवल प्रवाहाचा परिणाम — संतोष मोहदरे ........ ५७
१३. जागतिकीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्था — डॉ.जे.एम. काकडे, प्रा. रविंद्र बा. शेंडे ........ ६१
१४. जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवरील परिणाम — डॉ. करमसिंग राजपूत ........ ६४
१५. जागतिकीकरण-शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती व आत्महत्या — डॉ. ममता राममिलन साहु ........ ६८
१६. जागतिकीकरण आणि भारतीय शेतीचे अपयश — प्रा. डॉ. प्रतिभा एस. काळमेघ ........ ७०
१७. भांडवलशाहीच्या जागतिकीकरणाच्या उपलब्धी व मर्यादा — प्रा. डॉ. विठ्ठल घिनमिने ........ ७३
१८. जागतिकीकरणात कृषी क्षेत्राचा विकास व सद्यस्थिती — प्रा. डॉ. संजय. जे. कोठारी ........ ७९
१९ जागतिकीकरणाच्या प्रकिया — डॉ. अजय नानाजी सरटकर, रेणू ए. तिवारी ........ ८३
२०. जागतिकीकरणाचे आर्थिक व सामाजिक पैलू — प्रा. डॉ. जे. एस. हटवार ........ ८४
२१. जागतिकरण आणि ग्रामीण अर्थ व राजकारण — डॉ. राजेश संतोषराव बहुरुपी ........ ८६
२२. जागतिकीकरणाचे भारतीय समाजावर होणारे परिणाम — प्रा. राधेश्याम मानकर, प्रा. सुनिता निठोरी रविदास ........ ८९


## द्वितीय सत्र : सार्वजनिक क्षेत्राची यथार्थता


२३. भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील यथार्थता — प्रा. डॉ. चुन्नीलाल प. साखरवाडे ........ ९१
२४. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे बुडीत कर्जाचे वाढते प्रमाण व विलिनीकरण — डॉ. सु.रा. जगताप ........ ९३
२५. सार्वजनिक क्षेत्रातील बँकेतील अनुत्पादक मालमत्ता एक समस्या — प्रा. एन.ए. पिस्तुलकर, प्रा. यु.डी. चव्हाण ........ ९७
२६. भारताच्या आधारभूत विकासात सार्वजनिक क्षेत्राची भूमिका — डॉ. ईश्वर जनार्धन वाघ ........ १००
२७. भारतीय अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्राचे योगदान — सुभाष ज्ञा. गोटफोडे ........ १०४


Scanned by TapScanner

# जागतिकरण आणि ग्रामीण अर्थ व राजकारण

❑ डॉ. राजेश संतोषराव बहुरुपी
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

**जागतिकीकरण्याची संकल्पना :**

अनेक लोकांना जागतिकीकरणाचा अर्थ वेगवेगळा वाटतो. तथापि, या शंब्दाचा सोप्या भाषेत असा अर्थ सांगतिला जातो की 'जागतिककरण म्हणजे देशाच्या राजकीय सीमेबाहेर आर्थिक व्यवहारांचा विस्तार करणे होय यानुसार जागतिक अर्थव्यवस्थेच्या संदर्भात विविध देशांच्या अर्थव्यवस्थांचे परस्पर अवंलबून स्पष्ट होते. अर्थात, के परस्पर अवलंबून किती राहील हे सांगणे कठीण आहे. म्हणजेच जागतिकीकरण ही आर्थिक एकीकंरणाची प्रक्रिया आहे. पुढील महत्वाच्या व्याख्यांवरून जागतिकीकरणाची संकल्पना अधिक स्पष्ट होईल.

व्याख्या - एन्थेनी गीडेन्स - अनेकविध व्यक्तीयांनी आणि जगातील विविध क्षेत्रांमध्ये वाढणारी पारस्पारिकताच जागतिकरण आहे. ही पारस्पारिकता समाज आणि आर्थिक संबधात असते. ज्यामुळे वेळ व स्थान एकत्र येतात.

अर्थशास्त्रज्ञ सी.पी. खरे याच्या मतानुसार, जागतीकीकरण म्हणजे व्यापार वित्त दळणवळण व विदेशी स्थलांतरण, पर्यावरण, शासन, समाजव्यवस्था व संकृती अशा सर्व होणारे रुपांतरण होय.

दुसऱ्या महायुध्दानंतर जगभरातील राष्ट्रीय समाजाचे राजकीय स्वास्थच धोक्यात आलेले दिसते. बड्या राष्ट्रांनी भांडवल, विज्ञान-तंत्रज्ञानाची गुतंवणूक करून वस्तु व सेवा यांचे उत्पादन आणि विक्री द्वारा नफा मिळविता येण्याच्या आणि आमच्या सुखोपभोगात, संपत्तीत आणि सत्तेत लाभ घेण्याच्या आड कोणी येऊ नये. पाणी, जमीन, जंगल, खनिज संपत्ती पाहिजे तेवढी हस्तगत करता यावी. उत्पादित मालाच्या विक्रीसाठी बाजारपेठा खुल्या असाव्या, जगभरातील मानव संसाधने (कामगार, ग्राहक, सेवक) उपलब्ध व्हावे असा बहुलउदेश नव्या आर्थिक धोरणात, भांडवली देशांच्या लपलेला दिसून येतो. नव्या आर्थिक धोरणाची प्रक्रिया वाटते तितकी साधी व परिवर्तनशील नसून अतिशय क्लिष्ठ आहे. ह्याचे भान दक्षिणपूर्व आशिया, आफ्रिका ह्याच्यात जागतिकीकरणाचे परिणाम पाहून लक्ष्यात येते.

भारतीय व्यवस्था लोकशाहीप्रधान सामाजिक सरंचनेवर राजकारणाचा व त्यातून अवलंबविलेले धोरणाचा परिणाम होऊन सामाजिक घडण विस्कळीत झाल्याचे आढळून येते. मानवाया उपजिवीकेसाठी साधनसामुग्रीच्या अधिकाराची विक्रेद्रित रोजगारप्रधान उद्योगांची तसेच अर्थव्यवस्थेची आवश्यकता आहे. जगण्यासाठी अन्नसुरक्षा , निवास सुरक्षा, अन्यायविरूद्ध सरंक्षण, विकासाचे नावावर उध्वस्त झालेले व्यवसाय व व्यवसायिक घटक इत्यादीचे संरक्षण, अशाप्रकारे सरंक्षण शक्य नसल्यास पुनर्वसन यातून साध्य करावयाची लोकशाही, सहिष्णुता, समता व शोषणमुक्ती इत्यादीची गरज आहे.

भांडवलशाही-जागतिकीकरणाच्या संदर्भात नवे आयाम १९९० च्या दशकात विकसित झाल्याचे आढळून येते. जागतिकीकरणाचा परिणाम आर्थिक सरंचनेवर झालेला आहे. प्राचीन काळातील मत्स्य व्यवसाय, खाणी, जंगल. लघु उद्योग, कारागीर, संघटित, अंसघटित कामगार, छोटे व्यवसाय इत्यादी घटक जागतिकीकरणामुळे प्रभावित झाल्याचे दिसून येते. खऱ्या अर्थाने शाश्वत विकास घडवून आणायचा असल्यास समता-शोषणमुक्ती संकल्पनेत व राजकारणात या सर्व घटकांना समाविष्ट करणे काळाची गरज आहे. नव्या संदर्भातील वाटचातील समतापूर्ण व विकसनशील विक्रेद्रीकरणाचे अनुषंगाने पंचायतराज संकल्पनेचे महत्व पूढे येत आहे. यावरून असे स्पष्ट करता येईल की समूह आणि व्यक्तिचा अर्थपूर्ण अधिकारासाठी सुजनशीलता आणि लोकशाही निर्णय प्रक्रिया केद्रिकृत सरंचनेपासून दूर जाऊन 'ग्राम स्वराज्य' ही संकल्पना अधिक दृढ करणे. निर्णय प्रक्रिया व सत्ता सरंचनेचे विक्रेंद्रीकरण होणे गरजेचे आहे. तथापि, आशय व प्रक्रिया यातून वरील व्यवसाय, स्थळ व काळानूसार बदल घडवून स्वीकृत करणे आवश्यक आहे. शोषित समूहाच्या सक्षमीकरणासाठी विक्रेंद्रीकरण आवश्यक आहे. विक्रेंद्रीकरण परिणामकारक होण्यासाठी अधिकार, लोकसहभागासह लोकसहमती महत्वाची आहे.

जागतिकीकरणामुळे उद्योगधंदे, साधनसामुग्री, जलस्त्रोत, जंगल, जमीन इत्यादीची मूळ अवस्था संपुष्टात येते. त्यांचा परिणाम दुर्बल घटकांवर होऊन त्यांचे शोषण केले जाते. राजकीय नेतृत्वाकडून भांडवलशाहीला अधिक झुकते माप



Scanned by TapScanner

दिल्या जाते. त्यामुळे प्रकल्पग्रस्त/धरणग्रस्त, आदिवासीचे पुनर्वसन सामाजिक समता या संकल्पनेत होत नसल्यामुळे विक्रेद्रीकरण ही संकल्पना मोडीत आल्याचे स्पष्ट होते. विक्रेंद्रीकरणातून सामाजिक, आर्थिक, समानता निर्माण होऊन प्रत्येकांच्या गरजा पर्यावरणाचा ऱ्हास होत असेल अशावेळी नियोजनबद्ध कार्यक्रमातून जुळवून घेऊन उत्पादित आवश्यक गरजा पूर्तीसाठी उत्पादन क्षमता वाढविण्याचा प्रयत्न होणे आवश्यक आहे. एखादा कमी लोकसंख्येचा देश तेथील भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग किंवा त्यांची अमंलबजावणी त्यांचे देशात करीत असेल त्याच तंत्रज्ञानाची तशीच अमंलबजावणी भारतासारख्या अवाढव्य लोकसंख्या असलेल्या देशात भौगोलिक परिस्थिती विचारात न घेता करणे म्हणजे विकास घडवून आणणे असा त्याच्या अर्थ होत नाही. त्यामुळे जागतिकीकरणाच्या संकल्पनेचा विचार करतांना येथील नैसर्गिक संसाधने, हवामान, लोकसंख्या, रोजगार , बाजारपेठा , वीज, पाणी, जंगल, जमीन इत्यादीचा अर्थशास्त्रीय संकल्पनेतून विचार होणे अगत्याचे आहे.

**सार्वजनिक क्षेत्रावर परिणाम :**

भारताने सार्वजनिक क्षेत्राच्या माध्यमातून १९९० पर्यंत बरीच प्रगती केली होती. वीज, पाणी, उर्जा ह्या क्षेत्रात प्रसंशनीय प्रगती केली पण हस्ती सार्वजनिक उद्योग खाजगी गुंतवणूकदारांकडे जात असल्याने ग्रामीण व शहरी विकासाला खीळ बसण्याची पाळी आली आहे. खेडीखाली होत आहेत. शहरे लोकसंख्येनी फुगत आहेत. इंडिया टुडेच्या सर्वेक्षणानुसार १५ ते २० लक्ष खेड्यात पिण्याचे पाणी व रस्ते नाहीत, ९० टक्के ग्रामीण भागात स्वच्छंतेच्या सुविधा नाहीत. ४०,००० च्या जवळपास खेड्यात शाळा नाहीत. त्यामुळे ग्रामीण जनता, दारिद्र्य पाण्यावर गंडातर आणले जात आहे. त्यामुळे देशाचा भूमी सुधार अजेंडा कचरापेटीत फेकला गेला. हे करण्यास राज्य सरकारांनाही प्रवृत्त केले रेषेखालील लोक, आदिवासी आणि स्यियांकरिता जागतिकीकरण, उदारीकरणाचे धोरण दिवास्वप्न ठरले आहे.

भारताला स्वतंत्र मिळाल्यापासून ग्रामविकासासाठी मोठ्या रकमेची तरतूद अर्थ संकल्पात केली जाते. परंतु मंजूर झालेला एक रूपया झिरपत जाऊन फक्त १५ पैसे ग्रामविकासावर खर्च होतात. अशी खंत श्री. राजीव गांधींनी व्यक्त केली होती. १९९१ ला नरसिंहराव शासन काळात बेरोजगारांच्या संख्येत भर पडून ३,६३,००,०००/ - इतकी बेरोजगारी वाढली होती. जुनी कर्जे व त्यावरील व्याज भरणे कठीण झाले होते. आतंरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय रूपयांची घसरण सुरू होती. सरकारचे अर्थव्यवस्थेवरील नियंत्रण सुटू लागले होते. अर्थात हे संकट मानवी होते. आजवरचा सरकारांचा अदूरदर्शीपणा, उधळपट्टी , जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष, उदासीन प्रवृत्ती अशी अनेक कारणे देता येतील. शेवटी जुर्ले १९९२ ला भारत सरकाने 'गॅट' करारावर मोठी आशा बाळगून सही केली. आणि उद्योग धंद्याच्या क्षेत्रात खाजगी करणाला सुरूवात झाली. पुढे भाजपप्रणीत रा.लो.आ. शासनाने त्याचेही स्वागत केले. ह्या सरकारच्या काळात मारूती उद्योग, एअर इंडिया, उच्च शिक्षण, दूरसंचार विभागाचे खाजगीकरण करण्यात आले.

**शिक्षणक्षेत्र :**

जागतिकीकरणामुळे शिक्षण क्षेत्र ही प्रभावित झाले. भारतात शिक्षणमहर्षी, शिक्षणतंत्र आणि शिक्षण सम्राटांची संख्या भरपूर असूनही शिक्षण क्षेत्र मागे पडत आहे. भारताचे शेजारी राष्ट्र 'कम्युनिष्ट चीन' ह्या क्षेत्रात किती तरी पुढे आहे. २००९ च्या क्रमवारीत पहिल्या पाचशे विद्यापीठाच्या यादीत अमेरिका १५२, ब्रिटनची ४०, फ्रान्सची २३, चीनची ३० तर भारताची दोन विद्यापीठे पुढे आहेत. चीनने तर एका दशकात भारताला मागे टाकले आहे. गरीब-श्रीमंत, मुलगा-मुलगी व इतर कोणताही भेदभाव न ठेवता सर्वांना चांगल्या दर्जाचे राष्ट्रीय शिक्षण देणे याला त्यांनी प्राथमिकता दिली आहे. पण लोकशाही भारतात दूरदर्शीपणा व चुकीच्या धोरणामुळे शिक्षण क्षेत्राची मोठीच हानी झाली आहे. हल्लीच्या शिक्षणमंत्री व पंतप्रधानाच्या प्रयत्नांनी देशात आवश्यक वातावरण निर्माण होताना दिसत आहे. गुणवत्तेत वाढ, दर्जा आणि सर्वसमावेशकतेच्या त्रिसुत्रात उच्च शिक्षणात पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न होतांना दिसत आहे.

**गावातील राजकारण :**

देशातील बिटिश शासनापूर्वी आजच्या सारखी नियंत्रण व्यवस्था नसल्यामुळे प्रत्येक गाव विकासीत होण्याचा प्रयत्नात सर्वांच्या गरजा प्रत्यक गावात पूर्ण केल्या जात होत्या. आता परिस्थिती बदलेली असून गावापसून तर देशाच्या राजधानी पर्यंत संदेशवहनामुळे ताबोडताब माहिती मिळते. सध्या स्थितीत ज्याचाकडे आर्थिक नियंत्रण असते त्याचाकडे जास्त कारभार सोपविला जातो. गावच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य घटक शेतकरी असल्यामुळे गावातील जनतेकडे खेळत राहतो. आजच्या स्थितीत गावातील जातीचे वातावरण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. निवडणूकीच्या काळात जातीचा प्रभाव मोठ्या प्रमाणात वाढतो. सर्व राजकारण जातीनुसार असते. हल्ली गावातील मतदाता

ISBN 978-81-935528-5-8



Scanned by TapScanner

शाहाणा झाला असून नफा तोट्याचा विचार करू लागलेला आहे. ग्रामीण मतदार आपल्या लोकप्रतिनिधीकडून अनेक प्रकारच्या अपेक्षा बाळगतो. यामध्ये वीज पाणी सडका व राहण्याचा सोयी इत्यादी.

**शिफारशी :**

१) राजकीय पक्षांनी स्वच्छ राजकारणाबरोबरच विरोधी पक्षाने ही विरोधासाठी विरोध ही भूमिका सोडून राजकीय व प्रादेशिक हितांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यावर आपले स्वतःचे धोरण निश्चित करून शासनाने काही बंधने लावावी.

२) जमिनीचे वाटप करतांना 'कसेल त्याची जमीन' ह्या न्यायाने कृती करावी. देशाच्या पायाभूत सुविधा लघुउद्योग क्षेत्र विकसित करणे. नोकरभर्ती करणे, कामगार कपात थांबविण्याचे प्रयत्न करणे, रस्ते, आरोग्य, पर्यावरण, सरंक्षण ह्या गंभीर समस्यांना तोंड देण्यास प्रशासनात सक्रीयता जाणण्यास कार्यक्षम प्रशासकांची नियुक्त करणे आवश्यक आहे.

३) कृषी क्षेत्रांवर आधारित लघुउद्योग निर्मितीला प्रोत्साहन द्यावे. बँकांची भूमिका शासनाच्या धोरणात सकारात्मक असावी. समाजात विकास कार्यासंबधी विश्वास निर्माण करून कष्ट करण्याची प्रचंड मानसिकता निर्माण करण्यास कार्यशाळा घ्याव्या. स्थानीय पातळीवर छोटी-छोटी मार्गदर्शक केंद्र निर्माण करावी. शासकीय योजनेद्वारा महिलांचे बचत, गट, कम्युनिटी सेंटर उघडावे.

४) निर्यात वाढविण्यावर भर द्यावा. त्यामुळे परकीय चलन उपलब्ध होईलं. परिणामी देशाची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय विकास होऊन राष्ट्रभावना बळकत तर होईलच पण कल्याणकारी राज्यनिर्मितीचे उदिष्ट साध्य होईल.

५) विदेशातून आवश्यक वस्तुचीच आयात केली जावी. चैनीच्या वसतुंच्या होणाऱ्या जाहीराती शासनाने बंद कराव्या आणि स्वदेशीच्या वापरावर भर द्यावा. जीवनावश्यक वस्तुंच्या उत्पादन आणि पुरवठा करून देशाची संपत्ती वाढण्यासाठी शेती आणि अन्य उत्पादक क्षेत्रात भरपूर गुंतवणुक करावी. दुदैवाने ही होत नाही.

**सदंर्भसूची :**


१. नवसाम्राज्यवाद आणि जागतिकीकरण
२. जागतिकीकरण आणि भारत - नलिनी पंडीत
३. जागतिकीकरण, संस्कृती आणि स्त्रियांचा विकास- राजमोहन सेठी
४. समाजप्रबोधन पत्रिका, एप्रिल जुन २००२, पृ.९१
५. आजचा सुधारक २००८, आरक्षण विशेषांक, पृ. ६५
६. विचार मंथन (प्रथम अंक), २००२, पृ. ८७१
७. इंडिया टूडे, २००२
८. वृत्तपत्रे, दैनिक सकाळ, दैनिक लोकमत, दैनिक लोकसत्ता , देशोन्नती, २४१, २००
९. महाराष्ट्रातील सिंचन , पाणलोट आणि जलसंचारण, प्रा. डॉ. सुरेश ढमढेरे, पृ. क्र ४६


★★★

Scanned by TapScanner